SMART
PARTNERSHIP FOR PROSPERITY

[Quoted text hidden]

---

165-21.1.26.pdf
337K

---

**ANIL KOLPE** <anilkolpe123@gmail.com> 21 January 2026 at 12:47
To: Ahmednagar DIU <ahmednagar.diu.smart@gmail.com>
Cc: ANIL KOLPE <anilkolpe123@gmail.com>

मा. नोडल अधिकारी
जिल्हा अंमलबजावणी कक्ष
स्मार्ट प्रकल्प,
अहिल्यानगर

विषय : निविदा construction of onion storage shed 1000 MT (2025_DOAWB_1258515_1) संदर्भात आपल्या पत्राबाबत.

महोदय,
आपल्या कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या वरील विषयासंदर्भातील पत्राबद्दल धन्यवाद. सदर पत्रातील मजकूर मी काळजीपूर्वक वाचला असून त्याची नोंद घेतली आहे.

आपल्या कार्यालयास दिनांक 18/01/2026 रोजी ई-मेलद्वारे तक्रार सादर केली होती तसेच दिनांक 19/01/2026 रोजी प्रत्यक्ष भेट घेऊन संबंधित बाबींबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली होती. सदर चर्चेदरम्यान आपण दिलेल्या स्पष्टीकरणाची नोंद मी घेतली आहे.

आपल्या पत्रानुसार सदर निविदा प्रक्रिया ही शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार व पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येत असल्याचे तसेच कोणत्याही प्रकारचा दबाव किंवा गैरप्रकार होणार नसल्याची दिलेली खात्री लक्षात घेतली आहे.

सदर माहितीबाबत मला समाधान झाले असून भविष्यातील कार्यवाहीबाबत आपल्या सूचनांनुसार सहकार्य राहील.
आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

आपला विश्वासू,
अनिल कोळपे
मौजे सुरगाव पो. कोळपेवाडी
कोपरगाव, अहिल्यानगर
मो. नं. : ९७६६०६७३४०
ई-मेल : anilkolpe123@gmail.com
[Quoted text hidden]



Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन कृषि विभाग
मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प,
जिल्हा अंमलबजावणी कक्ष- प्रकल्प संचालक (आत्मा) कार्यालय, पंपींग स्टेशन जवळ, भुतकरवाडी, अहिल्यानगर
दुरध्वनी क्रमांक (0241) 2430551 ई मेल आयडी - ahmednagar.diu.smart@gmail.com

जा.क्र./स्मार्ट /संपादन /अनिल कोळपे -तक्रार / ९६५ /2026 दि.21 /01/2026

प्रती
अनिल कोळपे
ठेकेदार , सुरेगाव पो .कोळपेवाडी
कोपरगाव , अहिल्यानगर

विषय : निविदा construction of onion storage shed 1000 MT (2025_DOAWB_1258515_1) मागे घेण्यासाठी धमकी दिल्याबाबत तक्रार

संदर्भ: १ या कार्यालयास प्राप्त मेल दि १८/०१/२०२६ at १०:०६ PM
२ आपली या कार्यालयास प्रत्यक्ष भेट दि १९/०१/२०२६ at १०:५५ AM

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि ,संदर्भीय पत्रानुसार आपली तक्रार या कार्यालयास प्राप्त झालेली आहे. संदर्भ क्र २ नुसार आपण या कार्यालयास विषयांकित बाबीकरिता भेट दिलेली आहे. या प्रत्यक्ष झालेल्या चर्चेत आपल्या शंकाचे निरसन करण्यात आलेले आहे. सदर निविदा प्रक्रियेत आपण सहभागी झालेले असून आपल्यास आपले बीड मागे घ्यावयाची आवश्यकता नाही. संबंधित सिबिओ आणि ठेकेदारास दूरध्वनीद्वारे या प्रकाराबाबत समज देण्यात आलेली आहे. आणि असा प्रकार होणार नाही या बाबत त्यांनी खात्री दिलेली आहे.

सदर निविदा प्रक्रिया आणि सर्व निविदा प्रक्रिया ह्या संपादन प्रक्रियेच्या मार्गदर्शक सुचानेप्रमानेच होतात आणि विषयांकित निविदा हि मार्गदर्शक सूचनेनुसारच होईल. याबाबत आपणास अवगत करण्यात येत आहे. करिता माहितीसाठी सादर.

नोडल अधिकारी
जिल्हा अंमलबजावणी कक्ष
स्मार्ट प्रकल्प, अहिल्यानगर

Gmail **Ahmednagar DIU <ahmednagar.diu.smart@gmail.com>**

# निविदा Construction Of Onion Storage Shed 1000 MT (2025_DOAWB_1258515_1) मागे घेण्यासाठी धमकी दिल्याबाबत तक्रार

**ANIL KOLPE** <anilkolpe123@gmail.com> 18 January 2026 at 22:06
To: "ahmednagar.diu.smart@gmail.com" <ahmednagar.diu.smart@gmail.com>
Cc: ANIL KOLPE <anilkolpe123@gmail.com>

**प्रति,**
**जिल्हा अभियान व्यवस्थापक**
जिल्हा अंमलबजावणी कक्ष प्रकल्प संचालक आत्मा कार्यालय
मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प
अहिल्यानगर ४१४००३

**विषय:** निविदा मागे घेण्यासाठी संबंधित संस्था व ठेकेदाराकडून वारंवार धमकी दिल्याबाबत तक्रार.

महोदय / महोदया,
वरील विषयास अनुसरून नम्र निवेदन असे की, **Construction Of Onion StorageShed 1000 MT (2025_DOAWB_1258515_1)** या निविदा प्रक्रियेत आम्ही कायदेशीर व नियमबद्ध पद्धतीने सहभाग घेतलेला आहे.

मात्र, सदर निविदा मागे घ्यावी यासाठी संबंधित **संस्था Ranvara Farmers Producer Company Limited At. Chasnali Tal.Kopargaon Dist. Ahilyanagar व त्यांच्याशी संबंधित ठेकेदारा राजेंद्र प्रल्हाद बेलदार** यांच्याकडून आम्हाला वारंवार फोनद्वारे/प्रत्यक्ष/इतर माध्यमातून धमकी स्वरूपाचे दबाव व सूचना दिल्या जात आहेत. या प्रकारामुळे आम्हाला मानसिक त्रास होत असून निविदा प्रक्रिया निष्पक्ष व पारदर्शक राहण्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सदर प्रकार हा पूर्णपणे आक्षेपार्ह, नियमबाह्य व अन्यायकारक असून तो शासनाच्या निविदा नियमावली तसेच नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांच्या विरोधात आहे. अशा धमकीमुळे निविदा प्रक्रियेवर अवाजवी दबाव निर्माण होत असून निष्पक्ष स्पर्धेला बाधा येत आहे.

तरी, आपण सदर गंभीर बाबीची तात्काळ दखल घेऊन सदर निवीदा प्रक्रिया हि शासनाच्या नियमा नुसार तसेच संबधित मार्गदर्शक सूचनांचे पालन करून पूर्णपणे निष्पक्ष, पारदर्शक व कोणताही पक्षपात नाकारता राबवण्यात यावी , ही नम्र विनंती आहे.

तसेच, निवीदा प्रक्रियेतील सर्व आटी व शर्ती, तांत्रिक व आर्थिक मुल्यांकन निकष यांची अंमलबजावणी पारदर्शक रीतीने करण्यात यावी, अशी अपेक्षा आहे

आम्हाला विश्वास आहे की, आपल्या मार्गदर्शनाखाली हि निवीदा प्रक्रिया पूर्णपणे नियमानुसार आणि निपक्षपतीपणे पार पडेल. यामुळे शासनाच्या निधीचा योग्य विनियोग होईल आणि कामाचा दर्जाही राखला जाईल.

**आपला विश्वासू,**
अनिल बानाजी कोळपे
Reg. Govt. Contractor
रा सुरेगाव पोस्ट कोळपेवाडी
तालूका कोपरगाव जिल्हा अहिल्यानगर
महाराष्ट्र - ४२३६०२
संपर्क:- ९७६६०६७३४०
ऑफिस:- ०२४२३-२९९८८९